# पुणे अर्बन को-ऑप. बँक लि., पुणे
# २४, कसबा पेठ, लोंबर बिल्डींग,
# पुणे ४११०११

## बँकेच्या सर्व ग्राहकांसाठी के.वाय.सी.बाबत सुचना

बँकेला ''आपला ग्राहक जाणा'' (K.Y.C.) च्या मार्गदर्शक प्रणालींच्या संदर्भात आपल्या विद्यमान ग्राहकांची माहिती अद्ययावत करुन प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉड्रिंग अॅक्ट २००२ नुसार आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या सुचनांचे पालन करणे आवश्यक असल्याने पुढीलप्रमाणे

१. आपले अलिकडच्या काळातील पासपोर्ट साईज २ फोटो
२. ओळखीचा पुरावा. (उदा.पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, आधार कार्ड यापैकी एक)
३. निवासी पत्त्याच्या पुरावा. (लाईट बिल, टेलिफोन बिल, पासपोर्ट यापैकी एक)
४. वैयक्तिक खातेदारांशिवाय संस्था, सहकारी संस्था, भागिदारी संस्था, कंपनी, ट्रस्ट व इतर खातेदारांनी जे लागु असेल त्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रांच्या प्रती जमा कराव्यात.

ज्या ग्राहकांनी वरीलप्रमाणे K.Y.C. कागदपत्रांची पुर्तता केलेली नसेल, त्यांनी कृपया लवकरात लवकर सदरची पुर्तता करावी. आपल्या खात्यासाठी K.Y.C. कागदपत्रांची पुर्तता केली नाही, तर सदर खात्यावर दैनंदिन व्यवहार करता येणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी व याची सर्वस्वी जबाबदारी खातेदारांची राहिल.

ज्या खातेदारांनी आपल्या खात्यावर मागील एक वर्ष व त्यापेक्षा अधिक काळ कोणताही व्यवहार केला नाही व ज्यांची खाती निष्क्रिय (इनऑपरेटिव्ह किंवा डॉर्मंट) झालेली आहेत. त्यांनी K.Y.C. पुर्तता करुन खात्यावर व्यवहार सुरु करावेत. तसे न केल्यास रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही केली जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.

व्यवस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी